| MHRT050003972020 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | २३.०७.२०२० |
| | नोंदणी तारीख | : | २३.०७.२०२० |
| | निकाल तारीख | : | १७.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०५ ०७ २५ |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**<u>खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात</u>**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. एम. चव्हाण)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी.**

**(जाहीर दिनांक: १७.०३.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२०६/२०२०**

(गु.र.क्र.११/२०२०, रा.उ.शु., खेड)

**<u>निशाणी क्र.११ लगत</u>**

**फिर्यादी** **महाराष्ट्र सरकार**
**तर्फे राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग**
ता.खेड, जि. रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** **सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.व्ही.जी.गायकवाड.**

**आरोपी** **सुरेश रुमाजी निकम,**
वय – ६० वर्षे,
रा.मु.पो.कुलवंडी, देऊळवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपीकरीता वकील श्री.एस.एस.शेठ.**

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १७.०१.२०२० |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | १७.०१.२०२० |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २३.०७.२०२० |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १८.०३.२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०८.१२.२०२५ |
| निकालाची आरक्षीत तारीख | १७.०३.२०२६ |
| निकालाची तारीख | १७.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरेश रुमाजी निकम | १७.०१.२०२० | १७.०१.२०२० | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई)(फ) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निरंक |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक १७.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई)(फ) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता चालविण्यात आला.

**०२.** अभियोग पक्षाकडून केवळ फिर्यादीला तपासण्यात आले. सदर साक्षीदाराच्या साक्षीतून आरोपीविरुद्ध दोषसिध्दीदर्शक पुरावे मिळून आल्याने आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ नुसार निवेदन (निशाणी ११ लगत) नोंदविण्यात आले.

**०३.** अभियोग पक्षाची हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपीचा बचाव विचारात घेता, मी खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष मी त्या करिताचे कारणांसह विस्तृत करीत आहे.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दि.१७.०१.२०२० रोजी ०७:३० वा. मौजे कुलवंडी, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे ग्रामपंचायत कार्यालयाचे पूर्व दिशेस डुबी नदिकीनारी आरोपी हा त्याचे ताब्यात सु.५०० लि. मापाच्या चार प्लॅस्टीक सिंटेक्स टाक्या गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने पुर्ण भरलेल्या, सु.२०० लि. मापाचे तीन प्लॅस्टीक बॅरल गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने पुर्ण भरलेले, सु.२०० लि. क्षमतेचे दोन लोखंडी पत्री रिकामे बॅरल व सु.३५ लि. मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन हातभट्टी गावठी दारुने भरलेले असा मुद्देमाल बेकायदेशीरपणे बाळगताना मिळून आला व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई)(फ) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**०४.** आरोपीविरुध्द निर्धारित केलेले दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद साक्षीदाराच्या साक्षी पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

**०५.** मी अभियोग पक्षातर्फे सौ.व्ही.जी.गायकवाड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीकरिता विधीज्ञ श्री.एस.एस.शेठ यांचा युक्तिवाद ऐकला.

**<u>विचारार्थ मुद्दा क्र.१ व २ करीता</u> –**

**०६.** फिर्यादी राजेंद्र भालेकर यांच्या साक्षीनुसार दि.१७.०१.२०२० रोजी मिळालेल्या माहितीवरुन त्यांनी तसेच दुय्यम निरीक्षक श्री.सकपाळ, कार्यालयीन स्टाफ व दोन पंच यांनी मौजे कुळवंडी डुबी नदी किनारी छापा टाकला असता आरोपीच्या ताब्यात ५०० लि. क्षमतेच्या चार सिंटेक्स टाक्या व २०० लि. क्षमतेचे तीन प्लॅस्टीक ड्रम हे गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने पुर्ण भरले होते. तसेच २०० लि. मापाचे दोन बॅरल मिळून आले. तसेच झाडीझुडुपामध्ये लपवून ठेवलेले ३५ लि. मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन मिळून आले. त्या दोन्ही कॅनमध्ये आंबूस उग्र वासाची गावठी हातभट्टी दारु होती. सदर मुद्देमाल ताब्यात घेऊन कॅन, सिंटेक्स टाकी, बॅरेलमधून वेगवेगळ्या १८० मि.ली. काचेच्या बाटलीमध्ये रासायनिक विश्लेषणासाठी नमुने घेण्यात आले व त्यावर पंचांच्या व प्रभारी निरीक्षक श्री.जाधव यांच्या सह्यांचे लेबल लावून सील केले. सदर कारवाईचा जागीच पंचनामा करण्यात आला. दि.१३.०२.२०२० रोजी त्यांनी प्रत्यंतरासाठी राखून ठेवलेल्या नमुना बाटल्या पत्रकासह ताब्यात घेतल्या व त्या नमुना बाटल्या दि.१४.०२.२०२० रोजी रासायनिक प्रयोगशाळा कोल्हापूर येथे जमा केल्या व पत्रकाच्या दुय्यम प्रत वर संबंधितांची पोहोच घेतली. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराकडून पत्रकाची दुय्यम प्रत (निशाणी २१) तसेच त्यांनी आरोपीविरुध्द दिलेली फिर्याद (निशाणी २२) सिध्द करुन घेतली. उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने ह्या बाबी मान्य केल्या आहेत की, पंच साक्षीदार गणपत जाधव यांनी अनेक केसेसमध्ये पंच म्हणून काम केले आहे तसेच नमुना घेतलेल्या बाटल्या कोरड्या व स्वच्छ होत्या याबाबत वेगळा पंचनामा केला नव्हता.

**०७.** अभिलेखाचे अवलोकन केले असता त्यामध्ये न्याय सहाय्यक

वैज्ञानिक प्रयोगशाळेचा अहवाल दिसून येतो, परंतु तो अभियोग पक्षाने सिध्द केलेला नाही. अभियोग पक्षाला संधी देवूनही तसेच निरीक्षक श्री.आर्डेकर व पंच साक्षीदार यांना समन्स काढूनही साक्ष कामी हजर करु शकले नाही. अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिध्द केला नाही. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यास एकमेव फिर्यादीची साक्ष पुरेशी नाही. एकंदरीत, आरोपी हा बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टी दारु साठा तसेच दारु बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात रसायन बाळगून होता व गावठी हातभट्टीची दारु तयार करत होता हे संशयापलीकडे जावून सिध्द झाले नसल्यामुळे मी विचारार्थ मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो व विचारार्थ मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. आरोपी **सुरेश रुमाजी निकम** यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई)(फ) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल यापुर्वी नाश केला नसल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांच्याकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात यावा.

३. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र पुढील सहा महिन्याकरीता लागू राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.17 17:39:20 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,

**दिनांकः १७.०३.२०२६** ता.खेड, जि.रत्नागिरी.

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**iii**))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | राजेंद्र भागोजी भालेकर | फिर्यादी | ११ लगत |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २१/अ.सा.क्र.१ | रासायनिक प्रयोगशाळा कोल्हापूर येथे नमुना पोहोच केल्याच्या पत्रकाची दुय्यम प्रत |
| २. | २२/अ.सा.क्र.१ | फिर्याद |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | सु.५०० लि. मापाच्या चार प्लॅस्टीक सिंटेक्स टाक्या गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने पुर्ण भरलेल्या |
| २. | -- | सु.२०० लि. मापाचे तीन प्लॅस्टीक बॅरल गुळ व नवसागर मिश्रीत रसायनाने पुर्ण भरलेले |
| ३. | -- | सु.२०० लि. क्षमतेचे दोन लोखंडी पत्री रिकामे बॅरल |
| ४. | -- | सु.३५ लि. मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन हातभट्टी गावठी दारुने भरलेले |

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.17 17:39:28 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

**दिनांकः १७.०३.२०२६** प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, जि.रत्नागिरी.

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C. No.206/2020 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 17.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 17.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.03.2026 |